# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४२६

निर्णय दिनांक ०१-०८-२००८

१ श्री. रामनारायण मयारामजी बंग, : अपिलार्थी
दै. प्रजावाणी कार्यालय, पहिला माळा,
शिवाजीनगर, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा वन अधिकारी,
वन विभाग, नांदेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, वनविभाग
कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक वन संरक्षक, (रोहयो), नांदेड

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस श्री. रफिक अहमद पिता अमिरोद्दीन गाझी, जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय, नांदेड (यापुढे त्यांना

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर अपिलार्थी श्री. रामनारायण मयारामजी बंग व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक, (रोहयो), नांदेड हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित वर्ग-२ ते वर्ग-४ या श्रेणीतील कर्मचा-यांसदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> “ नांदेड वन विभाग अंतर्गत असे कर्मचारी, जे ३ वर्षापासून व तीन वर्षाच्या वरील जे एकाच ठिकाणी कार्यरत आहेत अशा सर्व कर्मचा-यांची नांवे व एकाच ठिकाणी कधीपासून आहेत याची सविस्तर माहिती.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-११-२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीसाठी एकूण १,१३० रुपये इतके शुल्क लागणार असल्याचे कळवून दिले. तथापि या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस सदर शुल्क भरण्याचे अथवा अपिलार्थीस माहिती देण्याकरिता किती पृष्ठांची माहिती लागेल त्याची संख्या व देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर कळविल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी माहितीसाठीचा मूळ अर्ज महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ प्रमाणे केला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले व अपिलार्थीस नव्याने विहित नमुन्यात अर्ज करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने परत विहित नमुन्यात दिनांक १४-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीच्या याही अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही सुनावणी घेतली नाही, मात्र दिनांक २०-०१-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणी ठेवल्याबाबतची टिपणी त्यांनी आयोगास सादर केली आहे. त्यावरुन असे दिसून येते की, दिनांक २०-०१-२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांना सदर माहितीची आवश्यकता नसल्याचे नमूद केल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याशी केलेल्या चर्चेअंती अपिलार्थीचे समाधान झाल्याचे त्यांनी कबूल केल्याने अपिलार्थीचे दोन्ही अपील अर्ज, अपिलार्थीच्या विनंतीवरुन, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या त्यांच्या आदेशाव्दारे निकाली काढले आहेत.

तथापि या सुनावणीपूर्वीच अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले होते. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने उप वनसंरक्षक, नांदेड यांच्या कार्यालयात दिनांक २०-०१-२००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी त्यांना सदर माहितीची आता आवश्यकता नसल्याने त्यांचे अपील निकाली काढण्यात यावे, अशी उप वनसंरक्षक यांना अपिलार्थीने विनंती केली होती. त्यावरुन उप वन संरक्षक यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०१-२००७ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीचे अपील निकाली काढले असल्याने आता अपिलार्थीस माहिती देण्याची काही आवश्यकता नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १०-११-२००५ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रथम प्रतिसाद पूर्णतः चुकीचा आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळवितांना त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस शुल्क भरण्यासाठी काहीही सूचित केलेले नाही, तसेच अपिलार्थीस देण्यात यावयाच्या प्रस्तावित माहितीची पृष्ठ संख्या व माहिती पुरविण्याचा प्रतिपृष्ठ दर अपिलार्थीस कळविला नाही. या उणिवामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ३०-११-२००५ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावरही कडी करुन अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेले दिनांक २३-०१-२००६ रोजीचे अपील त्यांना विहित प्रपत्रामध्ये करण्यास सांगितले. त्यांच्या सूचनेनुसार अपिलार्थीने दिनांक १४-०३-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विहित प्रपत्रात अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील

कलम १९ (६) च्या तरतुदीमधील विहित कालावधीत सुनावणी घेण्याऐवजी, त्यांनी दिनांक २०-०१-२००७ रोजी म्हणजेच अंदाजे ९ महिने इतक्या उशिराने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी ठेवली. अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला अपील अर्ज व प्रत्यक्षात या अपिलावर झालेली सुनावणी व व्यपगत झालेल्या कालावधीमध्ये अपिलार्थीस माहितीची आवश्यकता राहिली नाही, त्यामुळे त्यांनी माहितीची आवश्कता नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांना सांगितले. जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीचे दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या सुनावणीच्या दिवशी समाधान झाले असल्याने त्यांना आता माहिती देण्याची आवश्यकता नाही, हा त्यांचा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही, कारण अशा प्रकारचे कोणतेही निवेदन अपिलार्थी यांच्याकडून राज्य माहिती आयोगास आजपावेतो प्राप्त झालेले नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीस ही माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीमध्ये दिलेली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी लागेल, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी मागणी केलेली माहिती स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत उपस्थित राहून ती हस्तगत करुन घ्यावी.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय घेण्यासाठी अधिनियमातील कलम १९ (६) चा निःसंशयपणे भंग करुन आपल्या

कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला चुकीचा प्रतिसाद पाहता त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत त्यांच्याकडे उपलब्ध करुन ठेवावी व ही माहिती अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः हजर झाल्यास त्यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०१-०८-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामनारायण मयारामजी बंग, दै. प्रजावाणी कार्यालय, पहिला माळा,

शिवाजीनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक, (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.